पाक्षिक | वार्षिक वर्गणी रु. ३० | किंमत १ रुपया २५ पैसे

# शेतकरी संघटक

वर्ष १० वे | अंक ९ वा | २१ ऑगस्ट १९९३

# जमीनधारणा सुधार का अर्थव्यवस्था सुधार ?

**— शरद जोशी**

जमीनधारणेचा प्रश्न पुन्हा एकदा वादळ उठवणार अशी चिन्हे दिसत आहेत.

या वर्षाच्या सुरुवातीला अंदाजपत्रक सादर करताना अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी शेतीच्या व्यवस्थापनाकरितातरी तुकडेबंदी करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला होता.

परंतु, त्यानंतर दोन महिन्यांत दिल्ली येथे भरलेल्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत अगदीच वेगळा सूर निघाला. नेहरू जमान्यातील जुन्याच जमीनसुधारणा कायद्याचा अंमल अधिकाधिक जोमाने करण्याचा निर्णय पंतप्रधानांनी जाहिर केला.

लोकसभेसमोर ठेवलेल्या राष्ट्रीय कृषि धोरणाच्या मसुद्यात शेतीची तुकडेबंदी हे शेतीपुढील एक महत्त्वाचे आव्हान असल्याचे म्हटले होते. पण त्याबरोबरच जुन्या, सुधारणा-कायद्यांच्या अंमलबजावणीवरही भर दिला होता. ज्याला जे आवडेल ते त्याने घ्यावे!

अलिकडे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार यांनी फळबागांकरिता जमीनधारणेवरील कमाल मर्यादा उठवण्याचा निर्णय जाहिर केला आहे. घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याबद्दल पवार साहेबांची ख्याती नाही. त्यांनी घेतलेला निर्णय त्यांच्याच पक्षाच्या मध्यवर्ती धोरणाशी न जुळणारा आहे. त्या निर्णयाला हिरवा कंदील दाखवला जाईल अशी शक्यता कमी आहे. कमाल जमीन धारणा पीकनिहाय बदलणे हे प्रशासनाच्या दृष्टीने जवळजवळ अशक्य आहे. फळबागांसाठी जास्त मोठी जमीन काही विशेष फायद्याची ठरते, असे नाही. पवार साहेबांच्या योजनेचा फायदा फळांवरील प्रक्रिया करणारे पाश्चिमात्य तोंडवळ्याचे कारखाने उभारणाऱ्यांनाच होईल. या निर्णयामागे, सत्तेतील काही सज्जनानी ताब्यात घेतलेली जमीन नियमात बसवणे हा प्रमुख उद्देश आहे, असे म्हटले जाते. हे सगळे खरे असले तरी जमीनधारणेचा आणि वाटपाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेला आणण्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करायला पाहिजे.

गेली साठसत्तर वर्षे जमिनीचे फेरवाटप हा शेतीविषयक समाजवादी कार्यक्रमाचा पाया होता. जमीनदारी नष्ट करावी, कसणाऱ्याच्या हाती जमीन द्यावी, जमिनीच्या धारणेवर कमाल मर्यादा ठेवावी म्हणजे शेतीतील गरीबीचे सगळे प्रश्न सुटतील अशी समाजवाद्यांची भूमिका असे. त्यांच्या डोळ्याला गावातील झोपडी आणि पडका वाडा यांच्यातील तफावत टोचत असे; आणि झोपडीच्या गरीबीच मूळ कारण गावातील वाडे आहेत अशी त्यांची भूमिका होती. शहरातील गगनचुंबी इमारतींचा गावातील झोपडीतील गरीबीशी जो काही संबंध असेल त्याचा उल्लेख ही मंडळी कटाक्षाने टाळत.

समाजवाद्यांचा जमिनीच्या फेरवाटपासंबंधी काही नैतिक राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोन होता.

### शेतकऱ्यांचे नेहरूकालीन नमुनाचित्र

**गावातील नेतृत्व संपवा, गावात फक्त छोटे शेतकरी ठेवा, हे शेतकरी फक्त कष्टाचे मालक. त्यांनी काय पिकवावे, कसे पिकवावे, त्याने पिकवलेल्या मालाला काय भाव मिळावा हे सगळे निर्णय सरकारच्या हाती आणि ते राबवले जाणार सरकारी नोकरशाहीमार्फत.**

### खुल्या अर्थव्यवस्थेतील अर्थात् बळीराज्यातील शेतकरी

**नवनवीन उमेदीने, सतत नवीन प्रयोग करणारा, भरपूर उत्पादन घेणारा, देशी आणि परदेशी बाजारपेठेत पाय रोवून फायदा कमावणारा आणि त्याबरोबरच, देशाची अन्नधान्याची, कच्च्या मालाची आणि परकीय चलनाची गरज पुरी करणारा, असे नव्या शेतकऱ्याचे चित्र असेल.**

जमिनीच्या मालकीतील विषमता दूर करून सर्वांना सारखी जमीन अशी व्यवस्था करावी, अशी गरीबांच्या कळवळ्याची साधुसतांनी घेतलेली भूमिका समाजवाद्यांनीही घेतली. ही त्यांची नैतिकता गावापुरतीच मर्यादित होती, हे दुर्दैव. दिल्लीत स्वतःच्या मालकीच्या दहावीस लाखाच्या घरात राहणारे डावे विचारवंत दहापंधरा एकर जमिनीच्या मालकावरही दात काढीत. आणि, पन्नास एकराचा मराठवाड्यातील शेतकरी रोजगार हमी योजनेत दगड फोडायच्या कामावर सर्रास दिसला तरीही त्यांच्या विचारात फरक पडला नाही. शहरात दरडोई जोते दहा चौरस फुटाचे भरेल. तेव्हा, शहरातील घरवाल्यांनी दर माणशी फारफार तर पन्नास चौरस फूट माणशी ठेवून राहिलेल्या जागेत बाहेरच्या कुटुंबांची सोय करावी असे मांडण्याइतकी समाजवाद्यांची नैतिकता अतिरेकाला गेलेली नव्हती!

अनेक राज्यांत जमीनदारांनी रयतेवर, कुळावर केलेल्या अमानुष जुलमाच्या अनेक सत्यकथा कानावर येत असत. जमीनदारांची मध्ययुगीन जुलमी वर्तणूक हे जमीनदारी संपण्यासाठी सर्वांना सहज पटण्यासारखे कारण होते. कित्येक शतकांच्या अनेक राजांच्या, सुलतानांच्या लुटालुटींनी, लढायांनी आक्रमणांच्या बेबंदशाहीच्या काळात, आसमानी आणि सुलतानीमुळे वारंवार येणाऱ्या दुष्काळाच्या काळात जमीनदारांनी रयतेला काही ना काही तरी संरक्षण दिले होते. जमीनदारीचा सगळाच इतिहास काही काळाकुट्ट नव्हता. ही गोष्ट समाजवाद्यांनी सोयीस्कररित्या नरजेआड केली. खानदानी जमीनदार बहुतांशी १८५७ च्या उठावानंतर देशोधडीला लागले, फासावर चढले. त्यांच्या जागी इंग्रजांनी त्यांना सामील झालेल्या गावगुंडांना जमीनदार नेमले. नवीन जमीनदारांच्या उन्मत्तपणात अमेरिकेतील यादवी युद्धासारख्या घटनांनी शेतमालाच्या व्यापाराला काही काळ मिळालेल्या छप्परफाड धनदौलतीमुळे हे नवे जमीनदार उन्मत्त झाले. कथाकादंबऱ्यातील ऐषआरामी, विलासी, उन्मत्त, जुलमी जमीनदार हे प्रामुख्याने ह्या समाजातील होते. इतकी वस्तुनिष्ठता समाजवाद्यांच्या मठीत असू शकतच नाही. शहरात मालक नोकरांवर जुलूम करत नव्हते, असे नाही; घरगड्यांवर, मोलकर्णींवरही अत्याचार होत. पण त्या कारणाने घरमालकांची जायदाद त्यांच्या नोकरांना मिळावी असा युक्तिवाद कोणा तत्त्वनिष्ठ समाजवाद्याने केल्याचे ऐकिवात नाही.

जमिनीच्या फेरवाटपाचे समर्थन करण्यासाठी समाजवादी अर्थशास्त्र्यांनी काही मोठे विनोदी निष्कर्ष काढले. लहान जमिनीच्या तुकड्याची उत्पादकता जास्त असते, छोटे शेतकरी त्यांच्या मालाला अधिक चांगली किंमत मिळवतात. ही अशा निष्कर्षांची उदाहरणे. जमिनीच्या छोट्या तुकड्यांची उत्पादकता जास्त असते कारण त्यावर सगळ्या शेतकरी कुटुंबाची जीवतोड मेहनत होते. उत्पादकतेचा संबंध केवळ जमिनीशी नाही, श्रमाशी आहे.

जमिनीच्या मोठ्या तुकड्यात उत्पादकता कमी आढळते, कारण तेथे श्रमशक्ती कमी पडते; छोट्या तुकड्यातील शेतीवरील कष्टात जी आपुलकी असते त्याची भरपाई करणारे आधुनिक व्यवस्थापन मोठ्या शेतीलाही परवडत नाही. असल्या बारकाव्यांची पत्रास डाव्या अर्थशास्त्र्यांना असायचे काय कारण? दहा पोती वांगी मुंबईला पाठवणाऱ्या शेतकऱ्यांपेक्षा पाटीभर वांगी डोईवर घेऊन पायी चालत बाजारच्या गावी जाणाऱ्या शेतकरणीला किलोमागे जास्त भाव मिळतो एवढ्या साध्यासुध्या गोष्टीत समाजवाद्यांना लहान शेतीची श्रेष्ठता स्पष्ट दिसत असे.

रशियातील आणि इतर समाजवादी देशांतील सामूहिक शेतीचे कौतुक करणारे भारतात मात्र छोट्या छोट्या तुकड्यांची शेती झाली पाहिजे असे आग्रहाने मांडीत.

शेतीवरील बचत ओरबाडून नेली जात आहे, शेतावरची माणसे मात्र शेतावरच बोझ बनून राहिली आहेत, ज्यांच्याकडे थोडीफार जादा जमीन असेल त्या सगळ्यांची जमीन काढून घेतली आणि भूमीहिनांना वाटली तर प्रत्येकाच्या वाट्याला काडेपेटीभर जमीनही येणार नाही आणि अशा फेरवाटपाचा गरीबी हटण्याशी काही संबंध असू शकणार नाही या साध्या अंकगणिताकडेही डाव्यांनी डोळेझाक केली.

त्यांचा आपला एक धोशा; एकच सूत्री कार्यक्रम – जमिनीचे समान वाटप करा.

समाजवाद्यांच्या या मोठ्या शेतकऱ्यांच्या विरोधभक्तीचा फायदा झाला तो छोट्या शेतकऱ्यांना किंवा भूमिहीनांना नाही. भूमिहीनांच्या पदरी दोन अडीच एकर जमिनीचा तुकडा पडला तर तो लागवडीखाली आणण्याइतकी त्यांची ताकद नसे आणि मोठ्या कष्टाने तेथे शेती केली तरी त्यातून काही सुटायचे नाही. एवढी शेतीची जाणकारी डाव्या प्राध्यापकांना नसली तरी भूमिहीनांना जरूर होती.

जमीन सुधारणा कायद्यांचा फायदा मोठ्या जमीनदारांनाच झाला. स्वातंत्र्य येता येता जमीनदारी संपवण्यासाठी जे कायदे झाले त्यांमुळे ६४ लाख एकर जमीनीचे फेरवाटप झाले आणि मोबदला म्हणून जुन्या जमीनदारांना त्यांनी दिलेल्या पडीक, टाकाऊ जमीनीकरिता ६५० कोटी रुपये मिळाले; म्हणजे आजच्या हिशोबात जवळजवळ २० हजार कोटी रुपये. जमीनदारांनी त्यांच्या गेलेल्या जमिनी एकावेळी बाजारात विकायला काढल्या असत्या तर सगळी बाजारपेठेच कोसळली असती. आणि या रकमेच्या दहावा भागसुद्धा त्यांना मिळाला नसता. एवढा पैसा हाती आलेले जुने जमीनदार शहरात आले. काहींनी व्यापार सुरू केला; काहींनी कारखानदारी. पुष्कळसे राजकारण आले. आजचे पंतप्रधान याच वर्गातील एक. त्यांच्या उरलेल्या साताठशे एकर जमिनीचा वाद आणि त्यासंबंधी

करण्यात आलेले खोटे दस्तावेज यांची प्रकरणे आजही चालू आहे. जमीनसुधाराच्या कायद्यांची अंमबजावणी जोमाने करण्याच्या गर्जना हे जमीनदारच करत आहेत.

मोठ्या शेतकऱ्यांच्या विरुद्धच्या आघाडीचा फायदा शहरांना झाला. गावातील जमीनदार, सावकार शेतकऱ्याला लुटत हे खरे; पण निदान दुष्काळासारख्या अडीअडचणीत लुटीतील काही भाग तरी गावाच्या उपयोगी पडे. शेतीतील बचत शहरात भांडवल म्हणून पोचायची असेल तर गावातील लुटारूंना दूर केले पाहिजे हे शहरी चाणाक्षांनी अचूक हेरले होते! शेतकऱ्याची 'लक्ष्मी' शहरात आणायची असेल तर गावातील ठग दूर झाले पाहिजेत असा नव्या शहरी ठगांचा बेत होता. आणि तो यशस्वी झाला. जमीनदार गेले, सावकार गेले, पण शेतकरी पहिल्यापेक्षाही जास्त गरीबीत आणि कर्जात बुडत राहिला.

समाजवाद्यांनी जमीनदाराविरुद्धच्या शेतकऱ्यांच्या भावनांचे भांडवल केले आणि त्याचा फायदा घेऊन राज्यकर्त्यांनी भारतीय घटनेतील मालमत्तेचा हक्कच नष्ट करून टाकला. त्यासाठी कोणत्याही न्याय्यव्यवस्थेच्या चौकटीत न बसणाऱ्या गोष्टी देशावर लादल्या. मालमत्तेच्या मालकीसाठी 'परिवार एकक' धरणे, शेतकऱ्याच्या घरी जन्मलेल्या मुलींना मालमत्तेचा हक्क नाकारणे आणि शेतजमीनीवरील आपला हक्क शाबीत करण्यासाठी शेतकऱ्याला न्यायालयाचा दरवाजा बंद करणे अशी अतिरेकी सुलतानी डाव्यांनी देशावर लादली.

नेहरूकालीन नियोजनात शेतकऱ्याचे एक नमुनाचित्र गृहीत धरलेले होते. या नमुनाचित्राची रूपरेषा पहिल्यांदा स्टॅलीनने काढली. गावातील नेतृत्व संपवा, गावात फक्त छोटे शेतकरी ठेवा, हे शेतकरी फक्त कष्टाचे मालक. त्यांनी काय पिकवावे, कसे पिकवावे, त्याने पिकवलेल्या मालाला काय भाव मिळावा हे सगळे निर्णय सरकारच्या हाती आणि ते राबवले जाणार सरकारी नोकरशाहीमार्फत. थोडक्यात, नेहरूवादी शेतीचे चित्र म्हणजे बिनमोदबल्याच्या शेतीच्या राष्ट्रीयीकरणाचाच डाव होता. शेतकरी नामधारी मालक, पण स्वतःची अवजारे घेऊन येणाऱ्या कामगारासारखीच त्याची स्थिती. शेतीच्या व्यवसायातील एकही निर्णय त्याच्या हाती नाही अशी व्यवस्था नेहरूंच्या मनात होती. ती फळाला आली नाही, कारण जमीनदारी-विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीतून कुशलतेने स्वतःची सुटका करून घेतलेले, त्यांच्याच पक्षातील जिल्हा पातळीचे पुढारी. नेहरूंच्या मनात तर, यापुढेही पाऊल टाकून सहकारी आणि सामुदायिक शेती देशात आणायची होती. चौधरी चरणसिंग आणि डॉ. पंजाबराव देशमुख इत्यादींच्या कडव्या विरोधामुळे नेहरूंना तो नाद सोडून द्यावा लागला.

समाजवादाचा पाडाव अलिकडे झाला तरी त्याची पीछेहाट सुरू होऊन बराच काळ झाला. गेल्या दहा वर्षांत शेती ही काही जीवनशैली नाही, शेती हा व्यवसाय आहे हा क्रांतीकारी, नवा दृष्टिकोन शेतकऱ्यांनी स्वीकारला आहे. नेहरूवादी व्यवस्थेचे दिवाळे वाजले आणि खुल्या अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्याची भाषा सुरू झाली. तेव्हा, जमिनीच्या वाटपाचे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत आणि गरीबी हटवण्यात नेमके स्थान काय याबद्दल पुन्हा एकदा सार्वजनिक चर्चा होणे आवश्यक आहे.

जमिनीच्या फेरवाटपाच्या मागणीमागे एक समजूत होती. प्रत्येक मालमत्ता उत्पादनाचे साधन असते. ज्याच्या हाती संपत्ती, साधने; ज्यांच्या हाती भांडवल, त्याच्या त्याच्या हाती उत्पन्नाचा ओघ; ही मार्क्सवाद्यांची श्रद्धा होती. निदान भारतीय शेतीच्याबाबत तरी ही समजूत खोटी होती हे शेतकरी संघटनेने अनेक तऱ्हेने सिद्ध केले आहे. डंकेल प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने भारतीय शेतकऱ्यास सबसिडी नाही, उलटा दंडच आहे, हे अर्थशास्त्रीही कबूल करू लागले; आणि सरकारही लपत-छपत, लाजत-काजत स्वीकारू लागले. जमीन आजपर्यंत उत्पन्नाचे नाही तर, तोट्याचे साधन होती, हे सत्य असेल तर शेती किफायतशीर करण्याआधी जमिनीचे फेरवाटप म्हणजे 'राजा उदार झाला आणि भिकाऱ्याला हत्ती दिला' अशातली गत, हे स्पष्ट आहे.

नवीन खुल्या व्यवस्थेतील शेतकऱ्याचे चित्र म्हणजे लहानशा तुकड्यावर काबाडकष्ट करणारा शेतकरी आणि त्याचा परिवार असे नसेल. नवनवीन उमेदीने, सतत नवीन प्रयोग करणारा, भरपूर उत्पादन घेणारा, देशी आणि परदेशी बाजारपेठेत पाय रोवून फायदा कमावणारा आणि त्याबरोबरच, देशाची अन्नधान्याची, कच्च्या मालाची आणि परकीय चलनाची गरज पुरी करणारा, असे नव्या शेतकऱ्याचे चित्र असेल. तर मग आर्थिक सुधार आणि समाजवादी जमीनसुधार एकत्र नांदू शकत नाहीत. निदान, डॉ. मनमोहनसिंगांच्या सूचनेप्रमाणे तुकडे तुकडे झालेली जमीन किमान व्यवस्थापनासाठी एकत्र आणण्याची काहीतरी सोय करावी लागेल.

● ● ●


बदलत्या परिस्थितीत

**खुल्या अर्थव्यवस्थेला पर्याय नाही.**

खुल्या अर्थव्यवस्थेसाठी

**चतुरंग शेती**

सीताशेती

माजघर शेती

व्यापार शेती

निर्यात शेती

अर्थात्

**जिद्द**

# अल्कोहोलवाल्यांना आम्ही का पोसायचं?

**– शिवाजीराव पाटील**

अध्यक्ष, राष्ट्रीय सहकारी साखर कारखान महासंघ

महाराष्ट्रात साखरेचे १०५ कारखाने आहेत. त्यात नव्या चारांची भर पडली आहे. त्यांपैकी फक्त २४ कारखान्यांची स्वतःची डिस्टीलरी (मद्यार्कनिर्मिती प्रयोगशाळा) आहे. इतरांकडची मळी अल्कोहोलसाठी बाहेर विकली जाते, विकावी लागते. आजवर आम्हाला टनाला फक्त १२० रुपये भाव मिळे. एक टन स्टँडर्ड मळीमध्ये साधारणतः ४८ किलो साखर मिळते. म्हणजे या ४८ किलोची किंमत आम्हाला फक्त एकशेवीस रुपये मिळत असे. हा तोटा आम्ही का सोसावा? जे कारखाने मुळातच अल्कोहोल करत नाहीत त्यांनी आपली मळी मातीमोलाने का विकावी?

आतापर्यंत हेच चालत होते. आमच्याकडून घेतलेल्या मळीमधून डिस्टीलरीत टनामागे २८० लिटर अल्कोहोल मिळते. अगदी पाच रुपये लिटर भावानेही त्याचे १४०० रुपये होतात. मग आम्हाला फक्त १२० रुपयेच का? महाराष्ट्रात एका हंगामात साधारणपणे १३ ते १५ हजार टन मळी तयार होते. एवढा तोटा आम्ही का सोसायचा? अल्कोहोलवाल्यांना आम्ही का पोसायचे?

आमच्या डिस्टीलरीमध्ये तयार होणाऱ्या अल्कोहोलचे (मद्यार्क) भावही आतापर्यंत सरकारच ठरवत होते. लिटरला पाच रुपये. केरळ सरकार आम्हाला आठ रुपये द्यायला तयार होते. म्हणजे अल्कोहोलच्या किमतीमध्ये डिस्टीलरीला मारायचे आणि मळीच्या किमतीत साखर कारखान्याला असेच सरकारचे धोरण आजवर होते. त्याविरुद्धचा आमचा झगडा कित्येक दिवस सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी आमचे गाऱ्हाणे घेऊन मी स्वतः पाच वेळा मुख्यमंत्र्यांकडे (सुधाकर नाईक) गेलो होते; परंतु काहीच परिणाम नाही. या उलट मक्तेदारीत राज्य सरकार ठरवेल त्या भावात अल्कोहोल विकायला लागायचे. त्याच्या पैशांनाही विलंब लागत असे. म्हणजे आम्हाला अल्कोहोल केरळला बाहेर विकू द्यायचे नाही; पण ते आमच्याकडून उधारीने,

## आमचेही प्रश्न

### साखरकारखानदारांना आम्ही का पोसायचं?
### रेशन व्यवस्थेला आम्ही का पोसायचं?
### कापूस एकाधिकाराला आम्ही का पोसायचं?
### भूखंडखोरांना आम्ही का पोसायचं?

खुल्या अर्थव्यवस्थेच्या दिशेने पुढचे पाऊल म्हणून केंद्रशासनाने साखर कारखान्यात तयार होणाऱ्या मळीच्या किंमतीवरील व वितरणावरील सर्व नियंत्रणे रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर साखरउद्योगात मोठी खळबळ माजली. या निर्णयामुळे मळीचा भाव नियंत्रित भावाच्या जवळ जवळ चौपट होणार आहे. त्यामुळे साखरकारखारदारीने या निर्णयाचे स्वागत केले यात काही आश्चर्य नाही. पण, मद्यार्क निर्मिती व रसायन उद्योग मात्र या निर्णयाने नाराज झाला आहे. या खुशी-नाराजीच्या लढाईत या निर्णयाचा लाभ ऊसउत्पादक शेतकऱ्याला कितपत पाहेचविण्याची जबाबदारी साखर कारखानदार घेतील याबद्दल कुणीच काही बोलत नाहीत. उलट, यात शेतकऱ्यांचे नुकसान होईल असा सूर काहीजण लावतात.

खुल्या अर्थव्यवस्थेत कुणी तरी शेतकऱ्यांचं हित करणार आहे असे मानण्याला आता वाव नाही. शेतकऱ्यांनी आता स्वतःच स्वतःच्या हिताची शेती करायला सुरूवात केली पाहिजे. चतुरंग शेतीतील कोणत्याही अंगाने स्वतःचा आर्थिक विकास करू पाहाणाऱ्या शेतकऱ्यांनी त्याच्या व्यवसायावर इतर कोणत्याही गटाच्या हितासाठी सरकारी नियंत्रणे आली तर विचारावयाच्या प्रश्नाचा नमुना राष्ट्रीय साखर महासंघाचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव पाटील यांनी दिला आहे. नुसता प्रश्न नव्हे, तर त्यामागचे तर्कशास्त्र आणि अर्थशास्त्रही ! पुण्याहून प्रकाशित होणाऱ्या 'अर्थमंथन' या साप्ताहिकात छापून आलेला हा लेख शेतकऱ्याच्या अभ्यासासाठी येथे साभार पुनर्मुद्रित करीत आहे.

हा लेख वाचून ऊसउत्पादकांनी, उसऊत्पादकांची लूट करून फोफावलेल्या साखरकारखानदारीला 'तेव्हा कोठे गेला होता राधासुता, तुझा धर्म?' असा प्रश्न विचारून काही उपयोग नाही. त्यांनी विचारायला हवं-

**साखरकारखानदारांना आम्ही का पोसायचं?**

**धान्यवाल्यांनी विचारायला हवं-**

**रेशनवाल्याना आम्ही का पोसायचं?**

**कापूस उत्पादकांनी विचारायला हवं -**

**कापूस एकाधिकाराला आम्ही का पोसायचं?**

**जमीनधारकांनी विचारायला हवं -**

**भूखंडखोरांना आम्ही का पोसायच?**

आणि नुसतं विचारून थांबून चालणार नाही; तर या सगळ्यांचा मलिदा थांबवावा लागेल.

मक्तेदारीने घ्यायचे. हा कोणता न्याय? नियंत्रण तुमच्या (सरकारच्या) हातात असल्याने साखर कारखान्यांची गळचेपी करायचे हे बरोबर नव्हते; पण आतापर्यंत तेच चालत आले होते.

आता परिस्थिती बदललेली आहे. मळी, अल्कोहोलच्या किमतीवरील नियंत्रणे गेली आहेत. त्याच्या राज्याबाहेर हालचालींवरचीही बंधने उठली आहेत; परंतु त्यालाही अनेकांचा विरोध आहे. आपल्याकडे रासायनिक उद्योग, खांडसरी साखरेचे उत्पादन, अल्कोहोलवाले यांच्या लॉबी आहेत. उत्तर प्रदेशसारख्या राज्यात ऊसपिकापैकी फक्त ४५ टक्के साखर कारखान्यांसाठी वापरला जातो. उरलेला गूळ, खांडसरीसाठी. नियंत्रण उठविण्याविरुद्ध त्यांचा मोठाच आरडाओरडा चालू आहे. हरियाणा, पंजाब, आंध्रप्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश या राज्यांच्या सरकारांनीही या दबावाला बळी पडून नियंत्रणे उठविण्याला विरोध केला आहे.

पण आता हे धोरण कायम राहील. नियंत्रणे एकदा जी उठली आहेत ती पुन्हा येणार नाहीत. कारण आम्ही प्रख्यात कायदेतज्ञ नरीमन, माजी सरन्यायाधीश यशवंतराव चंद्रचूड यांनी मते आजमावली. त्यांच्या मते हा कायदा केंद्र सरकारने केला आहे. त्याला राज्य सरकारांच्या कायद्यापेक्षा अग्रक्रम राहील, तोच कायदा राज्यांना पाळावा लागेल, खुल्या किमतीचे धोरण ही आता काळ्या दगडावरची रेघ आहे!

# दारू दुकानबंदी आंदोलन

शेतकरी महिला आघाडीच्या अध्यक्षा आमदार सौ. सरोज काशीकर यांच्याकडे तसेच आंबेठाण कार्यालयाकडे पुढील गावांतील दारू- दुकानबंदीच्या ठरावांच्या प्रती पोहोचल्या आहेत.

| | गाव | ठराव करणारी सभा | दिनांक |
|---|---|---|---|
| ४. | नंदगाव ता. किनवट जि. नांदेड | ग्रामसभा | १-५-९३ |
| ५. | कोलाहारी ता. किनवट जि. नांदेड | | |
| ६. | इस्लापूर ता. किनवट जि. नांदेड | ग्रामसभा | २०-७-९३ |
| ७. | सुजलेगाव ता. बिलोली जि. नांदेड | | |
| ८. | राजगाव ता. वाशिम जि. अकोला | | |
| ९. | वसगडे ता. करवीर जि. कोल्हापूर | महिला सभा | २५-७-९३ |
| १०. | लोहारी सावंगा ता. नरखेड जि. नागपूर | ग्रामपंचायत | २६-३- ९३ |
| ११. | जलालखेडा, ता. नरखेड जि. नागपूर | ग्रामपंचायत | ३०-३-९३ |

सध्या सुरू असलेल्या या आंदोलनात गावांनी ग्रामपंचायतीमार्फत दारुदुकान बंदीचे ठराव करून ते मुख्यमंत्र्यांकडे पाठवावयाचे आहेत.
त्याचबरोबर, त्याच्या प्रती,

१. आमदार सौ. सरोज काशीकर
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी
रामनगर, वर्धा.

२. शेतकरी संघटना कार्यालय
अंगारमळा, आंबेठाण (४१०५०१)

या पत्त्यांवरही पाठवाव्यात. म्हणजे कार्यवाहीच्या दृष्टीने महिला आघाडीच्या अध्यक्षांना या ठरावांचा पाठपुरावा करणे सोपे जाईल.

ठराव मुख्यमंत्र्यांकडे पाठविल्यानंतर, साधारणपणे पंधरा दिवसांनी, सदर ठरावावर शासनाने काय कार्यवाही केली किंवा केली नाही याचीही माहिती स्थानिक महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी वरील पत्त्यांवर पाठवावी.

**शेतकरी महिला आघाडी**

# अधिवेशन तयारीसाठी जिल्हाप्रमुखांचा दौरा

औरंगाबाद जिल्हाप्रमुख श्री. मधुकर दानवे ह्यांचा जिल्हा दौरा दि. २८/७/९३ पासून सुरू झाला. दि. २८ व २९ रोजी गंगापूर तालुक्यात असेगाव, माळीवाडा, अंबेगाव, माळीवडगाव, लासुर स्टेशन, सिद्धनाथ वडगाव, गंगापूर, मांजरी, वाहेगाव, कायेगाव, बेंडाळा, आगरवडगाव इत्यादी गावांना भेटी दिल्या, ह्यावेळी त्यांच्या सोबत श्री. दामोदर फाळके, यासीनभाई गणोरकर, मच्छिंद्रनाथ काळे, गुलाब थोरात, डॉ. अढाव ह्यांनी मदत केली. दि. ३०/७/९३ रोजी वैजापूर तालुक्यात खंडाळा, वैजापूर, तीडी, गायगाव ह्या गावांना भेटी दिल्या. सर्वश्री गोरख सोनवणे, सौ. सुमनताई पवार, फुलाबाई राजपुत, सत्यभामाबाई पवार, रंजक तांबे हे सोबत होते. पैठण तालुक्यात दि. ३१/७/९३ व १/८/९३ ला ढोरकीन, कारकीन, बीडकीन, कृष्णापूर, हारोळा, लोहगाव, पैठण, बालानगर, नांदर, आपेगांव, वाहेगाव इ. ठिकाणी भेटी दिल्या. सोबत यासीनभाई बागवान, फुलचंद भडके, ज्ञानेश्वर रंधे, शेषराव मिसाळ, हरिभाऊ मुळे, गणीभाई दगडुभाऊ सुलोचनाभाऊ मंडके इत्यादी होते. दि. ३/८/९३ कन्नड तालुका, ४ व ५ तारखेस खुलताबाद तालुक्याचा दौरा जिल्हाप्रमुखांनी केला.

(प्रतिनिधी, औरंगाबाद)

# शेतकऱ्यांची जिद्द

औरंगाबाद येथे होणाऱ्या शेतकरी संघटनेच्या ५ व्या अधिवेशनात आयोजित 'शेतकऱ्यांची जिद्द' अर्थात् माजघर शेती प्रदर्शनासंबंधी श्री. शरद जोशींचे सविस्तर सूचनापत्र शेतकरी संघटकच्या मागील अंकात प्रकाशित करण्यात आले आहे.

प्रदर्शनाची मांडणी नीटनेटकी करण्याच्या दृष्टीने प्रदर्शनात भाग घेणाऱ्यांची संख्या, त्यांना आवश्यक क्षेत्र, मांडामांडीचे सामान, तंत्रज्ञानविषयक साहाय्य इत्यादी बाबींची पूर्वकल्पना असणे आवश्यक आहे. म्हणून या सूचनापत्रातून, प्रदर्शनात भाग घेऊ इच्छिणाऱ्यांनी आपली माहिती ३१ ऑगस्ट १९९३ पर्यंत आंबेठाण कार्यालयाकडे पाठवावी असे कळविले होते. परंतु, एक दोन पत्रांशिवाय अजून कोणाकडून काही माहिती येण्यास सुरुवात झालेली नाही.

प्रदर्शनात प्रामुख्याने खालील विभाग असतील.

**१) सीता शेती –** रासायनिक आणि जैविक शेतीच्या चाकोऱ्यांतून सुटून शास्त्रीय, किफायतशीर शेतीचे पर्यायी तंत्रज्ञान शोधण्याचा प्रयत्न अनेक ठिकाणी अनेक शेतकरी भाऊबहिणी करत आहेत. प्रयोग म्हणून त्यांनी नेमके काय केले आहे, प्रगती कितपत झाली, काही नवे निष्कर्ष निघाले का यासंबंधी माहिती तसेच काही नवीन पद्धती, साधने, अवजारे, खते, औषधे, बियाणी सिद्ध झाली असतील तर त्यांचे या प्रदर्शनात स्वागत आहे. यापुढेही सीताशेतीचे म्हणून जे प्रयोग करण्याची योजना असेल त्यासंबंधी माहिती प्रदर्शनात ठेवता येईल. आपल्या प्रयोगासंबंधी माहिती चित्रे, आलेख, फलक किंवा प्रत्यक्ष नमुने अशा विविध मार्गांनी देता येईल.

**२) माजघर शेती – 'शेतकऱ्याची जिद्द'** प्रदर्शनात शेतकऱ्यांचा हा विभाग सर्वात मोठा असेल. या विभागात खालील प्रकारच्या वस्तू मांडता येतील.

अ) ताजा भाजीपाला, फुले, फळफळावळ

ब) धान्ये, तेलबिया, कडधान्ये कोणतीही प्रक्रिया न करता केवळ साफसूफ करून व्यवस्थित पॅकींग करून बाजारभावासाठी तयार केलेला माल. आपापल्या भागातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने; उदाहरणार्थ, आंबेमोहोर तांदूळ, दगडी ज्वारी, वायगावची हळदी इत्यादी.

क) प्रक्रिया केलेला विविध प्रकारचा शेती माल – भाज्या, फुले, फळे, धान्ये, तेलबिया, कडधान्ये इत्यादी. यात शेवया, सांडगे, कुरडया, पापड, लोणची, वाईन, चीज, खव्याचे पदार्थ यांचा समावेश असेल. प्रदर्शनात ठेवायच्या वस्तू रंगाने, रूपाने, चवीने सर्वसाधारण बाजारात लक्ष वेधून घेणाऱ्या ठरतील याची काळजी घ्यावी.

ड) तयार खाद्यपदार्थ – यात टिकाऊ आणि ताजे असे दोन्ही प्रकारचे खाद्य पदार्थ ठेवता येतील. मांडे, करंज्या, अनारसे असे टिकाऊ पदार्थ तर ताजे गरमागरम खाण्याचे विविध प्रकारचे वडे, पानगे, घावन इत्यादी पदार्थही लोकप्रिय होतील. या पदार्थांच्या पाकक्रियेचे प्रात्यक्षिक प्रदर्शनास भेट देणाऱ्यांचे लक्ष वेधून घेईल या विभागातील पदार्थांची प्रदर्शनात खुली विक्री करता येईल.

**३) व्यापार –** शेतीमालाच्या विक्रीसाठी देशात किंवा परदेशात ज्यांनी काही विशेष व्यवस्था केली असेल त्यांनाही प्रदर्शनात भाग घेता येईल.मागच्या ऑक्टोबर महिन्यात मुंबईत एक प्रदर्शन भरण्याचे ठरले होते. ते रद्द झाले. भाग घेऊ इच्छिणारांची पुरेशी नावनोंदणी न होणे हे त्यामागचे एक कारण होते. नंतर कळले की, जिल्ह्याजिल्ह्यातून बरेच जण या प्रदर्शनात भाग घेऊ इच्छित होते. पण त्याचा काय उपयोग?

यावेळी हे टाळावे म्हणून प्रदर्शनात भाग घेऊ इच्छिणाऱ्या शेतकरी भावाबहिणींनी आपले नाव, पत्ता, (संपर्कासाठी) टेलिफोन क्रमांक, प्रदर्शनात मांडावयाच्या वस्तूचे विवरण, मांडणीचे आवश्यक साहित्य, मंडपाचे अपेक्षित क्षेत्र, आवश्यक तंत्रज्ञान (पॅकिंग, छपाई) इत्यादी माहिती त्वरीत

शेतकरी संघटना कार्यालय
अंगारमळा, आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे

या पत्त्यावर पाठवावी.

आयत्या वेळी नाव न नोंदविलेल्या प्रदर्शकांची गर्दी झाली तर प्रदर्शनाच्या मांडणीतील सुबकता सांभाळणे कठीण जाईल व प्रदर्शनाला आठवडा-बाजाराचे रूप येईल. त्यामुळे खुल्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात या प्रदर्शनाची अपेक्षित फलश्रुती मिळणार नाही. हे लक्षात घेऊन आयत्यावेळी कोणालाही प्रदर्शनात जागा उपलब्ध करून दिली जाणार नाही.

**शेतकरी संघटना, ५ वे अधिवेशन**
**प्रदर्शन समितीच्या वतीने.**

## शेतीक्षेत्राच्या नावाने अनुदाने वाटण्याऐवजी शेतीक्षेत्रात गुंतवणूक करा

**जागतिक बँक**

सबसिडीच्या नावाने गगनाला भिडणारा खर्च आणि खर्चाच्या परतफेडीचा अत्यल्प दर, या क्षेत्रातील नवीन गुंतवणुकीची वानवा व कार्यक्षम वहितीमध्ये व देखरेखीसाठी अत्यल्प सार्वजनिक निधीचा विनियोग यामुळे भारतीय शेतीवर गंडांतर आले आहे.

भारताच्या आर्थिक परिवर्तनाच्या बाबतची प्रगती व त्यापुढील आव्हाने यासंबंधी जागतिक बँकेने एक अहवाल तयार केला आहे, त्यात हे मत नोंदविले आहे. त्यात असे म्हटले आहे की शेतीक्षेत्रातील खाजगी गुंतवणूक १९८० ते ९० या दशकाच्या सुरुवातीपासूनच कमी व्हायला लागली. काही पारंपरिक पिकांचे उत्पादन इतके कमी होऊ लागले आहे की ती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.

जागतिक बँकेने शेतीव्यवसायाच्या सुधारासाठी धोरणात्मक बदल सुचविले आहेत. शेतीक्षेत्रात सार्वजनिक निधी खर्च करताना तो अनुदाना (सबसिडी)च्या स्वरूपात न करता गुंतवणुकीच्या रूपात करावा. शेतीमालाच्या देशी बाजारपेठेतील सर्व अडथळे दूर करून व शेतीउत्पादनाला जागतिक बाजारपेठेची दारे खुली करून अधिक उत्पादनास प्रोत्साहन देण्यात यावे. शेतीमालाच्या आधारभूत किंमतीचे धोरण तसेच साठा करण्याचे धोरण यांमध्ये उचित बदल करणे या त्या सूचनांतील काही आहेत.

याखेरीज, सार्वजनिक वितरण व्यवस्था, अपारंपरिक पिकांसाठी नवीन तंत्रज्ञान शोधणे व त्याचा प्रसार करणे, शेतीव्यवसायात आणि हंगामांनंतर शेतीमालावरील प्रक्रिया उद्योगात विविधता आणणे, सिंचनव्यवस्थेच्या नियोजन व कार्यवाहीमध्ये सुधारणा घडविणे, जंगलांचे पुनर्निर्माण, संपत जाणाऱ्या साधनसंपत्तीचे संरक्षण करणे अशा बाबीही शेतीक्षेत्रात होण्याच्या आवश्यकतेवर या अहवालात भर दिला आहे. अपूर्ण सार्वजनिक पाटबंधारे प्रकल्प पूर्ण करणे, रस्ते व वीजपुरवठा या संरचनांचाही विस्तार होणे, ग्रामीण पतव्यवस्थेत सुधार इत्यादी बाबीही करण्याची आवश्यकता या अहवालात नोंदली गेली आहे.

शेतकी महिला आघाडीच्या अध्यक्षांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांना लिहिलेले पत्र .....

# महिला आयोग म्हणजे महिला चळवळीचे सरकारीकरण नव्हे

दिनांक : १३/८/९३

अध्यक्षा
राज्य महिला आयोग,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

आपले २ ऑगस्टचे पत्र मिळाले. आयोगाच्या कामाविषयी विचार विनिमय करण्यासाठी नागपूर येथे २८ व २९ ऑगस्ट १९९३ रोजी आपण भरवित असलेल्या महिला संमेलनाचे निमंत्रण मिळाले.

शेतकरी महिला आघाडी ही महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील ग्रामीण स्त्रियांची सर्वात व्यापक संघटना आहे. आघाडीच्या चांदवड व अमरावती येथील अधिवेशनात लक्षावधी स्त्रिया उपस्थित होत्या. एवढेच नव्हे तर चांदवडच्या जाहिरनाम्याने स्त्रियांच्या प्रश्नावरील चर्चेला एक नवीन दिशा मिळालेली आहे. स्त्रियांच्या दुःखाची व्यक्तीगत प्रकरणे हाताळण्यापेक्षा संघटित रितीने त्यांचे प्रश्न पुढे मांडणे आघाडी महत्त्वाचे समजते. याच कारणासाठी शेतकरी महिला आघाडीने महाराष्ट्रात पंचायत राज्याच्या सर्व जागा लढविण्याचा निर्णय घेतला होता. पंचायत राज्य निवडणुकांत स्त्रियांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या ते महिला आघाडीच्या या ठरावाच्या दबावामुळे हे सर्वमान्य आहे.

शासनाचा विरोध पत्करूनही दारूदुकानबंदीचा कार्यक्रम आघाडीने राबविला आहे. स्त्रियांच्या मालमत्तेचा हक्क हा मध्यवर्ती प्रश्न मानून संघटनेने लक्ष्मीमुक्तीचा कार्यक्रम गेली दोन वर्षे चालविला आहे. या काळात दोन लाखांवर ग्रामीण महिलांच्या नावावर जमीन झाली ही एक ऐतिहासिक घटना आहे.

महाराष्ट्रात ग्रामीण स्त्रियांच्या प्रश्नाकडे आघाडीने लक्ष वेधून घेतल्यानंतर त्या प्रश्नांना बगल देण्यासाठी स्त्रियांकरीता राखीव जागा आणि महिला आयोगाची निर्मिती हे निर्णय शासनाने घेतले. या निर्णयाबद्दल आघाडीस समाधान नाही; उलट, या निर्णयाच्या अंमलबजावणीबद्दल आघाडीस विशेष चिंता वाटते.

स्त्रियांसाठी ३० टक्के राखीव जागा ठेवल्यामुळे स्त्रियांच्या प्रतिनिधी पंचायत राज संस्थेत गेल्या नाहीत. प्रस्थापित पुढाऱ्यांच्या घरच्या महिला त्या जागी बसल्या, प्रत्यक्ष कारभार त्या पुरुषांकडेच राहिला, असा आजपर्यंतचा अनुभव दाखवतो.

महिला आयोगाच्या निर्मितीबद्दलही अशीच अवस्था आहे. आयोगाच्या निर्मितीसंबंधीचे विधेयक स्त्रीप्रश्नांच्या पारंपरिक आणि एकांगी संकल्पनेवर आधारले गेले. स्त्रियांवरील वैयक्तिक अन्यायाच्या प्रकरणांना मर्यादिबाहेर महत्त्व दिले गेल्यामुळे आयोगाला दिवाणी न्यायालयाचे स्वरूप येणार आहे. अशा प्रकरणांत न्यायालय आणि महिला संघटना ज्या तऱ्हेने अडकून पडतात त्याच तऱ्हेने हा आयोग अडकून पडेल याबद्दल आघाडीची खात्री आहे.

शिवाय, आयोगाची रचना एखाद्या सरकारी खात्याप्रमाणे झालेली आहे. लालफीतीत आयोग गुंडाळला जाईल हे निश्चित.

आयोगातील सदस्यांच्या नेमणुका उघड उघड राजकीय हेतूने झाल्या आहेत. एखादा अपवाद वगळता आयोगाच्या सदस्यांना महिला प्रश्नांची जाण व आंदोलनाचा अनुभव नसल्यात जमा आहे. महिला आयोग सरकारी खाते होणार, एवढेच नव्हे तर, व्यक्तीशः सदस्य सत्ताधारी पक्षाच्या दडपणाखाली राहणार आहेत. शासन दुसऱ्या कोण्या पक्षाचे झाले आणि त्या शासनाने आयोगाची फेररचना त्यावेळच्या राजकीय दृष्टिकोनातून केली तर महिला आयोग राजकीय खेळीचा विषय होईल व महिला आंदोलनाचे नुकसान होईल. म्हणून या आयोगावर राजकीय पक्षातील कोणीही सदस्य असता कामा नये.

महिला आयोगाने महिला संघटनांची नोंदणी करण्याचा एवढेच नव्हे तर, महिला संघटनांची नोंदणी रद्द करण्याचा अधिकार स्वतःकडे घेतला आहे. महिला आयोगाच्या या अधिकाराला या क्षेत्रात काम करणारी कोणतीही प्रामाणिक संघटना मान्यता देणार नाही. **'महिला आयोग म्हणजे महिला चळवळीचे सरकारीकरण नव्हे.'**

महिला आयोगासंबंधीचे विधेयक तयार करण्याचे वेळी महिला संघटनांशी विचार विनिमय केला गेला असता आणि महिला संघटनांच्या सल्लामसलतीने सदस्यांची नेमणूक झाली असती तर हे सर्व टाळता आले असते. मुख्यमंत्र्यांना या संबंधी शेतकरी महिला आघाडीने सूचना करूनही या पूर्वी विचार विनिमय टाळण्यात आला. आज देशभर जोर पकडू पहात असलेली स्त्रियांची चळवळ आपल्या राजकीय गोट्यांत बांधण्याचा महाराष्ट्र शासनाचा हा दुर्दैवी प्रयत्न आहे,तो यशस्वी होणार नाही हीच काय ती आनंदाची बाब आहे.

आपले पत्र शेतकरी महिला आघाडीच्या कार्यकारिणीच्या पुढील बैठकीच्या वेळी विचारासाठी विषय पत्रिकेवर घेतले जाईल. कार्यकारिणीचा निर्णय यथावकाश महिला आयोगास कळविण्यात येईल.

**सौ. सरोज काशीकर**
**आमदार व अध्यक्षा,**
**शेतकरी महिला आघाडी**

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 23rd, August 1993

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
August 21, 1993

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# विस्तारित कार्यकारिणी बैठक

## रविवार दि. ५ सप्टेंबर १९९३

## श्री वरद गणेश मंदिर सभागृह,

### मुख्य बसस्टँडजवळ, औरंगाबाद

औरंगाबाद येथे ऑक्टोबर महिन्याच्या अखेरी होणाऱ्या शेतकरी संघटनेच्या ५ व्या अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा आढावा घेऊन पुढील प्रचाराची आखणी करण्यासाठी शेतकरी संघटना व शेतकरी महिला आघाडीच्या विस्तारीत कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात येत आहे.

**विषय :** १. देशातील राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा आढावा.
२. अधिवेशनाच्या पूर्वतयारीचा आढावा व पुढील प्रचाराची आखणी.
३. दारू दुकानबंदी व लक्ष्मीमुक्ती कार्यक्रमांचा आढावा.
४. अधिवेशनातील वेगवेगळ्या विभागांची माहिती.

या बैठकीचे महत्त्व लक्षात घेऊन कार्यकारणीचे सर्व सदस्य, सर्व आजी व माजी तालुका जिल्हा प्रमुख व महिला प्रमुख तसेच बैठकीतील निर्णयप्रक्रियेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या, शेतकरी संघटनेच्या सर्व पाईकांनी या बैठकीस वेळेवर हजर राहावे ही विनंती.

ही बैठक ५ सप्टेंबर १९९३ रोजी सकाळी ठीक १० वाजता सुरू होऊन संध्याकाळी ६ वाजेपर्यंत चालेल.

आपले,

| | | |
|---|---|---|
| **सौ. सरोज काशीकर** | **हेमंत देशमुख** | **पाशा पटेल** |
| अध्यक्षा, | स्वागताध्यक्ष, | अध्यक्ष, |
| शेतकरी महिला आघाडी | शेतकरी संघटना, ५ वे अधिवेशन | शेतकरी संघटना |

**वि. सू. :** १. आपापल्या भागात झालेल्या 'दारू दुकान बंदी' ठरावांच्या सत्यप्रती ग्रामपंचायत कार्यालयातून घेऊन येणे.
२. लक्ष्मीमुक्ती केलेल्या गावांच्या शेतकरी व शेतकऱ्यांघरच्या लक्ष्मी यांच्या नावांच्या याद्या सोबत आणणे.
३. अधिवेशनानिमित्त जमा करण्यासाठी घेतलेली निधी, प्रतिनिधी शुल्क, स्वागत समिती सदस्यता शुल्क, स्मरणिका जाहिराती, शेतकरी संघटक वर्गणी अशी सर्व पावतीपुस्तके त्यामधील जमा रक्कम व इतर माहितीसह घेऊन यावे.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक — मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ — गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**